# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

**दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल** ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशि/विकापु/रोखपाल/२०२०१९/ 256 दिनांक - 14 JAN 2020

प्रति,
संचालक /प्राचार्य,
अनुदानित संस्था तंत्रनिकेतन,महाविद्यालये
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र इतर
पुणे विभाग पुणे.

विषय -अनुदानित संस्थांचे मुल्यनिर्धारण अहवालानुसार कमी/अधिक रकमांचे समायोजन करणेबाबत.

संदर्भ - तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.७/तंशिसं/अनुदान/मु.नि/२०१९/१२९ दिनांक २२/११/२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय परिपत्रक या कार्यालयास प्राप्त झालेले असून त्यात खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

शासन निर्णय दिनांक १८ मे १९७८ व ४ सप्टेंबर १९९९ च्या निर्देशानुसार संस्थेने सादर केलेल्या अंदाजानुसार संस्थेस तीन हप्ते आगाऊ अनुदान देण्यात येत होते व शेवटच्या हप्तात मागील वर्षातील मुल्यनिर्धारण अहवालातील कमी/अधिक रक्कम समायोजित करून संचालनालयाकडून सन २०१५-१६ पर्यंत अनुदान वितरीत करण्यात येत होते. शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट २०१५ अन्वये अनुदानित संस्थातील कर्मचा-यांचे वेतन व भत्ताचे देयक एचटीई सेवार्थ प्रणालीमधून संस्थाप्रमुख (डिडीओ स्तर १) यांनी तयार करून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (डिडीओ स्तर २) यांनी अचूक तपासणी करून कोषागारात सादर करून अनुदान वितरीत करण्याचे निर्देश आहेत. तसेच वैद्यकीय भत्ते,रजारोखीकरण, रजाप्रवास सवलत देयके पुर्विप्रमाणे हस्तलिखीत स्वरूपात सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (डिडीओ स्तर २) यांनी कोषागारात सादर करून संस्थांना अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संचालनालयाचे परिपत्रकानुसार अनुदान वितरीत करताना मागिल वर्षातील कमी/अधिक रक्कम समायोजित करावी अशा सुचना आहेत. तसेच मुल्यनिर्धारण अहवालावरून असे निदर्शनास येत आहे की, काही संस्थाकडे अधिकचे अनुदान असतांनासुध्दा संस्थाकडून अनुदानाची देयके या कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहेत. जसे की रजारोखीकरण,वैद्यकीय प्रतिपूर्ती इत्यादी देयके.

तरी यानुसार कळविण्यात येते की, ज्या संस्थांकडे मागील वर्षाचे मुल्यनिर्धारण केल्यानंतर अधिकचे अनुदान शिल्लक आहे, त्यांनी त्यांच्या संस्थेतील प्रलंबित देयके जसे की, रजारोखीकरण, वैद्यकीय प्रतिपूर्ती व इतर काही देयके असल्यास ती संस्थेकडे असलेल्या अधिकचे अनुदानातून वितरीत करावी. त्यासाठी या कार्यालयाकडे अनुदानाची मागणी करण्यात येवू नये तसेच देयके सुध्दा या कार्यालयाकडे सादर करून नयेत.

तसेच संस्थांचे प्रत्येक वर्षी मुदतीत मुल्यनिर्धारण करणे आवश्यक आहे. तरी ज्या संस्थांचे ऑडीट रिपोर्ट बाकी आहेत त्यांनी तात्काळ या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरून तातडीने मुल्यनिर्धारण कामकाज करणे या कार्यालयास शक्य होईल.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.